**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम राबविणेबाबत**

अपलोड नाही

महाराष्ट्र शासन

# पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्रमांक ग्रापापु-१००७/प्र.क्र.२४३/ पापु-०७

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ दिनांक ३१ डिसेंबर २००७

**शासन परिपत्रकः-**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांची बैठक 'यशदा,' पुणे येथे दिनांक २० व २१ सप्टेंबर, २००७ रोजी आयोजित केली होती. या बेठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने खालील स्पष्टीकरण देण्यात येत आहे:

| | मुद्दा | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १) | सर्वेक्षण २००३ नुसार तसेच गुणवत्ताबाधित गावांच्या सर्वेक्षणात काही त्रुटी आढळून आल्या आहेत. उदा. यादीतील गाव /वाडी आढळून न येणे, स्त्रोताचे स्थळ व नाव न मिळणे किंवा रासायनिक घटकाचे/दुषिताचे प्रमाण फार जास्तीचे दर्शविणे, तसेच काही गावे/वाडया आरोग्य विभागाच्या तपासणीत दुषित आढळून येणे परंतू यादी मध्ये त्या गावे/वाडयांचा समावेश नसणे, इत्यादी. | १) ज्या गावे/वाडयांच्या सर्वेक्षणाबाबत त्रुटी/उणिवा आढळून आल्या आहेत त्या गावे/वाडयांमधील वस्तुस्थितीबाबत जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा आणि आरोग्य विभागाच्या अधिका-यांमार्फत तपासणी करुन खात्री करुन घ्यावी आणि जिल्हयातील अशा सर्व गावे/वाडयांचा एकत्रित प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शासनास सादर करावा. शासनाच्या मंजूरी नंतर पुढील कार्यवाही करावी. |
| २) | ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केलेली दरसूची वापरण्यात येते. परंतु,सन २००७-०८ या वर्षाची चालू दरसूची लागू झाली नसल्याने दरसूचीनुसार दर व बाजारातील दरामध्ये तफावत असल्यामुळे कामामध्ये अडचणी येत आहेत. | २) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नवीन जिल्हा दर सूची आता जाहीर केली आहे. ती नुसार कार्यवाही करावी. |
| ३) | हागंदारीची अट शिथील करण्याबाबत. | ३) ही अट शिथील करण्याचे अधिकार संबंधित जिल्हयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना शासन निर्णय क्र.ग्रापापु १००७/प्र.क्र.१४०/पापु-०७ दि.१० सप्टेंबर, २००७ अन्वये देण्यात आले आहेत. याबाबतचा खुलासा प्रधान सचिव, पा.पु.व स्व.वि. यांचे पत्र क्र.स्वीस/प्रस/पापुवस्व/२००७/५ दि.२४ सप्टेंबर २००७ मध्येही करण्यात आला. असून हागंदारी मुक्ती बद्दल संबंधित ग्रामपंचायतीकडून हमीपत्र घेवून त्यांना अनुदानाचा दुसरा हप्ता देण्यात यावा. |
| ४) | सर्वेक्षण २००३ नुसार दुबार हाताळावयाच्या पी.सी. वर्गवारीमधील गावांमध्ये मागील २-३ वर्षातील चांगल्या पर्जन्यमानामुळे सध्या तेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई नाही, ते गाव | ४) प्रधान सचिव पा.पु.व स्व.वि. यांचे पत्र क्र.स्वीस/प्रस/पापुवस्व /२००७/५ दि.२४ सप्टेंबर २००७ मध्ये याबाबत देण्यात आलेल्या खालील सूचनेनुसार कार्यवाही करावी: |

| | | |
|---|---|---|
| | हाताळावयाचे किंवा कसे? | अशा गावांचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक असल्यास तेथे शिवकालीन साठवण योजने अंतर्गत स्त्रोत बळकटीकरण योजना घ्याव्यात व त्यांना हाताळलेली गावे म्हणून दाखवावीत. हे करीत असताना त्या-त्या गावात उपलब्ध असलेल्या सर्व योजनांची तपासणी करून यादी तयार करावी व दरडोई उपलब्ध पाण्याचे परिमाण ठरविण्यात यावे. |
| ५) | योजनेचे अंदाजपत्रक जिल्हापरिषदेने केले असल्यास, अंदाजपत्रक तयार करण्याचे २% शुल्क म.जी.प्रा.ला मिळणे व अंदाजपत्रक तयार करण्यासाठीच्या कामासाठी खर्च करण्यास परवानगी मिळावी. | ५) ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे अंदाजपत्रक व आराखडे जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, शासन पॅनेलवरील सक्षम सेवाभावी संस्था किंवा खाजगी यंत्रणेद्वारा करुन घेण्यास ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस मुभा देण्यात आली आहे. जर जिल्हा परिषदेने अंदाजपत्रक व आराखडे तयार केले असतील तर योजनेच्या मंजूर किमतीच्या २% अंदाजपत्रक तयार करण्याचे शुल्क जिल्हा परिषदेने ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस मुक्त केलेल्या पहिल्या हप्त्याच्या रकमेतून घ्यावे. |
| ६) | सद्यस्थितीत सिमेंटचे बाजारातील भाव वाढल्यामुळे मूळ मंजूर योजनेतील दराने सिमेंट मिळण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे कामास विलंब होत आहे. तेव्हा बाजारभावाने सिमेंट खरेदी करण्यास परवानगी देण्यात यावी. | ६) सिमेंट व पोलादाचे बाजारातील भाव वाढल्यामुळे मंजूर केलेल्या किंमतीत पाणी पुरवठा योजना पूर्ण करता येत नसेल अशा बाबतीत मंजूर किमतीच्या १०% पर्यंत अधिकच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार ग्राम पंचायतींना देण्यात येत आहेत. १०% पेक्षा अधिक किमतीच्या योजनांचे प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी पाठवावेत. |
| ७) | रु.७५ लाखापर्यंतच्या कामांना तांत्रिक मंजूरीचे अधिकार जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता यांना देण्यात यावेत. | ७) रु.७५ लाखापर्यंत भांडवली किमतीच्या योजनांची तांत्रिक तपासणी करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या /महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना शासन परिपत्रक क्र.ग्रापापु-१००५/प्र.क्र.८५/पापु-०७ दि.९ मे २००५ अन्वये देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्री. श्री. घोलप)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
सदस्य सचिव (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
उप आयुक्त (विकास), महसूल विभाग (सर्व)
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासन अधिकारी
निवडनस्ती